25 वर्षे
विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. ठाणे - 401 101 दुरध्वनी क्रं. 28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

**जा.क्र.मिभा/मनपा/पा.पु.व मलनि/ २२२ /२०२६-२६** **दि.०४/०५/२०२६**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

**महोदय,**

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(शरद नानेगांवकर)
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.04/05/2026

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) कडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

**अलनिनो (El Nino) व आयओडीच्या (IOD) प्रभावामुळे या वर्षी पावसाळा लांबण्याची शक्यता आहे. याबाबत जलसंपदा विभागा बरोबर दि.23/04/2026 रोजी झालेल्या बैठकीच्या निर्णयाप्रमाणे, आगामी कालावधीत पाणी टंचाईची परिस्थिती उद्भवु नये म्हणुन पाणी कपात करण्याचे ठरले आहे. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) बारवी जलशुध्दीकरण केंद्र, जांभुळ येथील जलशुध्दीकरण केंद्रातुन होणारा पाणी पुरवठा गुरुवार दि.07/05/2026 दुपारी 12.00 ते शुक्रवार दि.08/05/2026 दुपारी 12.00 वाजेपर्यंत तसेच गुरुवार दि.21/05/2026 दुपारी 12.00 ते शुक्रवार दि.22/05/2026 दुपारी 12.00 वाजेपर्यंत मिरा-भाईंदर शहराकरीता पाणी पुरवठा बंद राहील.** तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**"माझे शहर, माझा अभिमान"**